दै. नांदेड वार्ता

# शहर वाहतूक शाखेतही बोलमवाड चमकले

## नियम तोडणाऱ्या ६ हजार ७४४ वाहनांवर कारवाई



नांदेड/प्रतिनिधी- भाग्यनगर पोलीस स्थानकाच्या हद्दीत मजुराचा हात तोडणाऱ्या आरोपीची धिंड काढून गुन्हेगारांना धडकी भरवणारे पोलीस निरिक्षक सुर्यमोहन बोलमवाड यांची बदली शहर वाहतूक शाखेत झाल्यानंतर त्यांनी आपल्या कामाची चुणूक दाखवून द्यायला सुरुवात केली असून अवघ्या २० दिवसात वाहतुकीचे नियम मोडणाऱ्या २४७१ वाहन चालकांवर कारवाई करत त्यांच्याकडून १६ लाख १९ हजार ५०० रुपयांचा दंड वसूल केला आहे.

मुंबईसह अन्य ठिकाणी पोलीस निरिक्षकपदी कर्तव्य बजावलेल्या पोलीस निरिक्षक सुर्यमोहन बोलमवाड यांची गृह विभागाने नांदेड येथे बदली केली होती. त्यानंतर पोलीस अधीक्षक यांनी त्यांच्याकडे भाग्यनगर पोलीस स्थानकाचा कारभार दिला होता. त्यांच्या कार्यकाळात क्षुल्लक कारणावरुन एका मजुराचा हात तोडण्यात आला होता. मजुराचा हात जोडण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले होते. त्यांनी गुन्ह्यातील आरोपीला पकडून भाग्यनगर पोलीस स्थानकाच्या हद्दीत घटना घडलेल्या ठिकाणावरुन त्याची धिंड काढली होती. त्यानंतर लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर मागील २० दिवसांपूर्वी पान ४ वर

दै. लोकमत

# मुस्लीम बांधवांनी आणला गोडवा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अख्खे नांदेड शहर सोमवारी भगवेमय झाले होते. सर्व जाती-धर्माच्या समाजबांधवांनी रयतेच्या या राजाला अभिवादन केले. त्यात मुस्लीम समाजबांधवांनीही जन्मोत्सव सोहळ्यात गोडवा भरत रेल्वे स्टेशन परिसरात जिलेबी वाटप केली. मुस्लीम बांधवांच्या प्रेमाने शिवप्रेमीही भारावले होते.

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त नांदेड शहरात अनेक ठिकाणी सकाळपासूनच भंडारे सुरू होते. शिवाजीनगर भागात मुस्लीम बांधवांनी शोभायात्रेतील सहभागी शिवप्रेमींसाठी पाण्याची व्यवस्था केली होती. तसेच ठिकठिकाणी शोभायात्रेवर मुस्लीम बांधवांनी पुष्पवृष्टी केली. तर श्री छत्रपती शिवाजी महाराज मुस्लीम सेवा संघाच्यावतीने शिवजन्मोत्सवानिमित्त जिलेबी वाटप करीत शिवप्रेमींचे तोंड गोड करण्यात आले. संघटनेचे अध्यक्ष अयूबखान पठाण, कासीम वसीम बाबू, आरिफ खान पठाण, अजीज लहानकर, मोहम्मद शोयब, नईम खान, मोहम्मद आवेज यांच्या पुढाकारातून हा उपक्रम घेण्यात आला. त्याला शिवप्रेमींनीही भरभरून प्रतिसाद दिला.



### पोलिस अधीक्षकांनी केले कौतूक

पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी या ठिकाणी भेट देऊन मुस्लिम बांधवांचे कौतूक केले.